**नि.फौ.ख.नं.३५५/२०२५**

**नि.क्र. ४८**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार – ३**
**मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,**
नाव – दत्तात्रय देविदास लांभोर,
वय–४० वर्षे, धंदा – शेती,
राहणार– राक्षसवाडी बुद्रुक, ता.कर्जत, जि.अहमदनगर.

**साक्षीदार क्र.३ चा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. डी. आर. बाविस्कर यांचेतर्फे शपथेवर सुरु –**

१. दि.२५/०८/२०२१ रोजी पोलीसांनी मला मारुती उघडे यांच्या घरी पंचनाम्यासाठी बोलविले होते. मी त्याठिकाणी गेल्यानंतर पोलीसांनी तेथील पंचनामा केला. त्याठिकाणी पोलीसांनी एक विट जप्त केली व पंचनाम्यावर आमच्या सह्या घेतल्या. आता मला जप्ती पंचनामा दाखविला त्यावर पंच साक्षीदार क्र.१ म्हणून माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. (सदर जप्ती पंचनाम्यास **नि.क्र.४९** देण्यात आला.) मला पोलीसांनी जप्त केलेली विट दाखविल्यास मी ओळखू शकेन. (साक्षीदारास प्रस्तुत खटलयातील विटेचा तुकडा आर्टिकल–अ दाखविण्यात आला.) आता मला दाखविलेल्या विटेचा तुकडा पोलीसांनी माझ्या समक्ष जप्त केला होता. त्यावेळी पोलीसांनी सदर विटेचा तुकडा ज्या कागदात गुंडाळला होता त्यावर माझी देखील सही घेतली होती. आता मला सदर कागद दाखविला. त्यावर माझी सही आहे.

**सरतपास पूर्ण.**

**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एन. एस. खरात यांचेमार्फत साक्षीदार क्र.३ चा उलटतपास सुरु.**

२. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी मारुती निवृत्ती उघडे हा माझा मामा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला फिर्यादीने स्वतः त्यादिवशी बोलावून घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी ज्या ठिकाणी पंचनामा केला त्याठिकाणाला श्रीरामवस्ती म्हणून ओळखतात. त्याठिकाणी अंदाजे ५०–६० लोकांची घरे आहेत.

मला पोलीसांनी घटनेच्या दुसऱ्या दिवशी पंचनाम्यासाठी बोलविले होते. मला घटनेबाबत ज्या दिवशी घटना घडली त्याचदिवशी संध्याकाळी समजले होते. माझे शिक्षण इयत्ता ९ वी झालेले आहे. श्रीरामवस्ती मौजे राक्षसवाडी बु. येथील गावठाणात आहे. सदर गावठाण जागेचा नंबर मला सांगता येणार नाही. मला मौजे राक्षसवाडी बु. येथील गट क्र.१८५ माहित आहे, कारण त्या गटात माझे देखील नाव आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे आजोबा वारल्यानंतर त्यांचे वारस म्हणून माझ्या आईचे नाव इतर वारसांसह सदर गटात दाखल झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर गटामध्ये माझा प्रत्यक्ष ताबा नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे आरोपींशी बोलणे चालणे नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला सरतपासामध्ये दाखविलेल्या विटेच्या तुकड्या सारखे तुकडे बांधकाम चालु असलेल्या ठिकाणी पडलेले असतात. हे म्हणणे खरे आहे की, सदर जप्ती पंचनाम्यात काय मजकुर लिहिला आहे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यादिवशी पोलीसांनी आमच्या समक्ष पंचनामा तयार केला व मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी सदर पंचनामा तयार केला असल्यामुळे त्यात काय लिहिले आहे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आज रोजी मी फिर्यादीसोबत न्यायालयात आलेलो आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला फिर्यादीने आज रोजी पंच साक्षीदार म्हणून साक्ष देण्यास सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासात संपूर्ण खोटा मजकुर कथन केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.** स.सा.वा.दा.ब.अ.क.केले.

माझे समक्ष,

SHIVAJI N THAPEKAR

Digitally signed by SHIVAJI N THAPEKAR
Date: 2026.05.07 16:38:30 +0530

(एस.एन.थापेकर)

दिनांकः ०७/०५/२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत.

सदर जबाब मी टंकलिखित केला.

(व्ही.जी.घोगरे)

लघुलेखक,